दैनिक


# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १३१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२३ डिसेंबर २०२४


## सरकार कुठेतरी कमी पडतंय ! मस्साजोग प्रकरणी खा. नीलेश लंके यांची प्रतिक्रिया



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर सरकारने कोणतेही ठोस पाऊल उचलले नसून सरकार कोठेतरी कमी पडत असल्याची प्रतिक्रिया खा. नीलेश लंके यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासमवेत खा. नीलेश लंके यांनी मस्साजोग येथे जात देशमुख परिवाराने सांत्वन केले. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. खा. बजरंग सोनवणे,आ. राजेश टोपे आ. संदीप क्षिरसागर आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, घटना घडून इतके दिवस लोटले तरी आजूनही सरकारने कोणते ठोस पाऊल उचललेले नाही. याचा अर्थ सरकार कुठेतरी कमी पडत आहे. परभणी, बीडच्या घटना पाहिल्या तर या अतिशय दुर्देवी घटना घडलेल्या असल्याचे ते म्हणाले. दरम्यान, संसदेचे अधिवेशन आटोपून खा. नीलेश लंके हे शुक्रवारी सायंकाळी दिल्लीहून मुंबईत पोहचले. मुंबईहून पुणे येथे मुक्काम करून पुण्याहून ते शरद पवार यांच्यासमवेत मस्साजोग येथे पोहचले.

## मुंबईत महिना अखेरीपर्यंत गारठा कायम राहणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, मुंबई :** राज्यातील इतर ठिकाणांप्रमाणे पहाटेच्या वेळी गोठवणारा गारठा मुंबईत फारसा नसला तरी मागील दोन तीन दिवसांपासून गारवा जाणवत आहे. तापमानातील ही घट डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मुंबईत शनिवारच्या तुलनेत रविवारी सकाळी किमान तापमान अल्पशी वाढ झाली असली तरी उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे सकाळचा गारठा कायम आहे.

हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात रविवारी २१.५ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात २० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. तर येथील कमाल तापमान कुलाबा केंद्रात ३०.४ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात ३०.२ अंश सेल्सिअस इतके होते. सांताक्रूझ, गोरेगाव, कांदिवली पूर्व, मुलुंड पूर्व, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, भांडुप या परिसरात अधिक गारठा होता. दिवसभर कोरड्या वाऱ्यांचा प्रभाव कायम असल्याने उपनगरांमध्ये गारठा अधिक जाणवत होता. दरम्यान, डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत तापमानातील घट कायम राहणार आहे. मुंबई शहर तसेच उपनगरांत दिवसभर गार वाऱ्यांचा अनुभव येणार आहे. त्यामुळे पहाटे, दुपारी आणि सायंकाळीही थंडी राहील. त्याचबरोबर दाट धुके राहण्याची शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे. या कालावधीत कमाल तापमान ३०-३२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५-१९ अंश सेल्सिअस इतके राहील. आकाश अंशत: ढगाळ असेल.

**हवा वाईटच !**

गेले अनेक दिवस मुंबईच्या हवेची सरासरी नोंद 'मध्यम' असली तरी काही भागांतील हवा वाईट नोंदवली गेली आहे. समीर ॲपच्या नोंदीनुसार रविवारी मालाड, माझगाव, नेव्ही नगर कुलाबा , बोरिवली, देवनार आणि कांदिवली या भागात 'वाईट' हवेची नोंद झाली. तेथील हवा निर्देशांक अनुक्रमे २६४, २५०,२६८, २६८, २१०, २२४ इतका होता.

## येवला बाजार समितीत शेतकऱ्यांकडून लिलाव बंद !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नाशिक :** कांदा दरात सुरू असलेल्या घसरणीचे पडसाद स्थानिक पातळीवर उमटत असून शनिवारी येवला येथे संतप्त शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडत मनमाड-येवला रस्त्यावर तासभर आंदोलन केले.आठवडाभरापासून कांद्याचे दर घसरत आहेत. लाल कांद्याची आवक वाढत असताना देशांतर्गत मागणी कमी झाली. २० टक्के शुल्कामुळे निर्यातीला चालना मिळत नाही. या स्थितीत काही दिवसात कांदा दरात दोन हजारहून अधिकने घसरण झाली. दोन दिवसांपूर्वी लासलगाव बाजार समितीत संतापलेल्या शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडले होते.

शनिवारी त्याची पुनरावृत्ती येवला कृषी उत्पन्न बाजार समितीत झाली. कांद्याला केवळ १५०० ते १६०० रुपये क्विंटल भाव जाहीर झाल्याने शेतकरी संतापले. छावा संघटना आणि शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडले. नंतर येवला-मनमाड रस्त्यावर धाव घेऊन ठिय्या दिला. रास्तारोको आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णत: ठप्प झाली. कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क रद्द करावे, शेतकऱ्यांना २५ रुपये किलोप्रमाणे अनुदान आणि नाफेड व एनसीसीएफने खरेदी केलेल्या कांद्यातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. मागण्यांचे निवेदन पोलिसांना दिल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.

# देशात काय स्वस्त, काय महागणार?

## जीएसटी परिषदेची बैठक संपन्न!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, राजस्थान :** राजस्थानच्या जैसलमेर येथे जीएसटी (वस्तू व सेवा कर) परिषदेची ५५ वी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पॉपकॉर्नवर कर लावण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. परिषदेने पॉपकॉर्नच्या फ्लेवरनुसार (चवीनुसार) त्यावर कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच अर्थ वेगवेगळ्या फ्लेवरच्या पॉपकॉर्नवर वेगवेगळा जीएसटी आकारला जाईल. जीएसटी परिषदेच्या या बैठकीवेळी आरोग्य व जीवन विमा हप्त्यावरील वस्तू आणि सेवा करात सूट अथवा त्यात कपात करण्याचा निर्णय घेतला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, जीएसटी परिषदेने हा निर्णय लांबणीवर टाकला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत या संबंधाने नियुक्त मंत्रिगटाला कोणताही निर्णय घेण्यासाठी आणखी वेळ हवा असल्याचं सांगण्यात आलं आहे. मंत्रिगटाने १४८ वस्तूंवरील करामध्ये दरबदल करण्याची शिफारस केली आहे.

देशात सध्या, जीवन व आरोग्य विम्यावर भरलेल्या हप्त्यावर १८ टक्के दराने जीएसटी आकारला जातो. मंत्रिगटापुढे, यात सूट देण्यासह, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा व मुदतीच्या जीवन विम्यावरील करात सूट देण्याची तसेच ५ लाख रुपयांच्या आरोग्य विम्याच्य संरक्षणावरील ५ टक्के कर दर कमी करण्याबाबत शिफारस देण्यास सांगण्यात आले होते.

दरम्यान, जीएसटी परिषदेच्या या बैठकीनंतर कोणकोणत्या वस्तू व सेवा स्वस्त झाल्या असा प्रश्न सर्वांना पडला आहे. तसेच कोणत्या वस्तू व सेवा महागणार असल्याचं लोकांना जाणून घ्यायचं आहे. याची माहिती आम्ही तुम्हाला देत आहोत.




### काय स्वस्त होणार?

- फॉर्टिफाइड राइस केर्नल्स म्हणजेच एमआरके स्वस्त होईल. यावरील जीएसटी ५ टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे.
- जीन थेरपी पूर्णपणे जीएसटी कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आली आहे.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सरकारी कार्यक्रमांतर्गत पुरवल्या जाणाऱ्या खाद्यसामग्रीवर आता केवळ ५ टक्के जीएसटी आकारला जाईल.
- हवाई क्षेपणास्त्र असेम्ब्लिंग प्रणाली
- आयएईए तपासणी उपकरणे स्वस्त होतील. आंतराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीद्वारे तपासणीसाठी वापरली जाणारी उपकरणे.
- काळी मिरी व बेदाणे (शेतकऱ्यांकडून पुरवठा) : थेट शेतकरी विकत असलेल्या काळी मिरी व बेदाण्यांवर जीएसटी आकारला जाणार नाही.

### काय महागणार?

- जुनी, सेकेंड हँड वाहनं महाग होतील. यावर पूर्वी १२ टक्के जीएसटी आकारला जात होता. आता १८ टक्के जीएसटी भरावा लागेल.
- रेडी टू ईट पॉपकॉर्न : मीठ व मसाल्यांचा वापर करून तयार केलेले पॉपकॉर्न जे पॅक केलेलं नसेल आणि ज्यावर लेबल नसेल त्यावर ५ टक्के जीएसटी आकारला जाईल. दुसऱ्या बाजूला मीठ व मसाला वापरून तयार केलेले तेच पॉपकॉर्न पॅक केले व त्यावर लेबल लावलं असेल (पॅकेज्ड फ्लेवर्ड पॉपकॉर्न) तर त्यावर १२ टक्के जीएसटी आकारला जाईल. साखर व फ्लेवर वापरलेले पॉपकॉर्न आणखी महाग होणार आहे.

कॅरमेलसारख्या साखरेपासून तयार केलेले पॉपकॉर्न शुगर कन्फेक्शनरी श्रेणीत ठेवण्यात आले असून त्यावर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल.

- एसीसी ब्लॉक्सवर १२ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे.
- कॉरपोरेट्सद्वारे पुरवल्या जाणाऱ्या सेवा महागणार आहेत.

# आता छगन भुजबळांची पुढची भूमिका काय? म्हणाले...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नाशिक :** महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार १५ डिसेंबर रोजी पार पडला. मंत्रिमंडळात भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या काही आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. पण या मंत्रिमंडळातून काही दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही डावलण्यात आलं. मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे छगन भुजबळ हे नाराज आहेत. आज (२२ डिसेंबर) छगन भुजबळ यांची राज्यभरातील ओबीसी नेत्यांबरोबर बैठक पार पडली. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत पुन्हा एकदा अजित पवार यांच्यावर नाराजी व्यक्त केली. तसेच पुढची भूमिका घेण्यासाठी आपण सर्वांशी चर्चा करत असून निर्णय घेण्यासाठी वेळ लागेल, असंही भुजबळ यांनी म्हटलं आहे.

**छगन भुजबळ काय म्हणाले?**

आज ओबीसी नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीनंतर मला त्यांनी सांगितलं की असं कसं होऊ शकतं? तुम्ही राज्याचं ओबीसींचं नेतृत्व करता. ओबीसींच्या प्रश्नांसाठी तुम्ही राज्यात आणि विधानसभेत प्रश्न मांडले. आता तुम्हाला मंत्रिमंडळातून बाहेर ठेवलं, याचा अर्थ यामागे काहीतरी गौडबंगाल आहे. कारण तुम्ही नेहमीच ओबीसींच्या मुद्यांची पाठराखण केली आहे. त्यामुळे आम्हाला भिती वाटते की हे वेगळं काहीतरी आहे. त्यामुळे आम्ही तुमच्याबरोबर आहोत. आता पुढे काय करायचं? ते आपण बसवून ठरवा. असं ओबीसी नेत्यांनी सांगितलं, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं.

**आता पुढची भूमिका काय असेल?**

पत्रकार परिषदेत छगन भुजबळ यांना तुमची पुढची भूमिका काय असेल? असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, माझ्या पुढच्या भूमिकेबाबत तुम्हाला घाई झालेली दिसते. मात्र, मला माझी भूमिका



घ्यायला वेळ लागेल. त्यासाठी मी सर्वांशी चर्चा करत आहे, असं सूचक विधान छगन भुजबळ यांनी केलं.

'काही वरिष्ठांना मंत्रिपद दिलं नाही, याचं कारण तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची असते', असं अजित पवारांनी एका मेळाव्यात बोलताना म्हटलं. यासंदर्भात छगन भुजबळ यांना प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची ही चांगली गोष्ट आहे. मात्र, तरुणांना संधी द्यायची यासाठी व्याख्या ठरवली पाहिजे. मग त्यामध्ये किती वर्षांपर्यंत तरुण म्हणायचं? मग ६७ ते ६८ वर्षांपर्यंतही तरुण म्हणायचं का? हे ठरवलं पाहिजे ना?, असा टोला छगन भुजबळ यांनी लगावला.

मला अगोदर सांगितलं असतं की तुम्ही निवडणुकीत उभं राहू नका, तर मी राहिलो नसतो. पाच महिन्यांपूर्वी मला लोकसभेत पाठवत होते, तेव्हा माझी संपूर्ण तयारी झाली. मात्र, तेव्हाही मला थांबवावं लागलं. त्यानंतर राज्यसभेची निवडणूक आली तेव्हा म्हटलं मला राज्यसभेवर पाठवा. तेव्हा मला म्हणाले की, तुमची गरज राज्यात जास्त आहे. मग आता माझी गरज कमी झाली का? असं होतं तर मला निवडणूक लढवायला सांगायचं नव्हत. आज माझ्या मतदारसंघात एक वेगळं वातावरण निर्माण झालं ते झालं नसतं. आता सर्व झाल्यानंतर मला सांगतात की राज्यसभेवर जा. मी आता राज्यसभेत जायचं याचा अर्थ मी विधानसभेचा राजीनामा द्यायचा. मग मी राजीनामा कसा देऊ?, असा सवाल छगन भुजबळ यांनी केला.

# थंडीचा कडाका सरला, आता हलक्या पावसाची चिन्हे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पुणे :** गेल्या काही दिवसांत शहर आणि परिसरात वाढलेला थंडीचा जोर आता कमी होऊन किमान तापमानात वाढ होऊ लागली आहे. तसेच पश्चिमी विभोक्ष (वेस्टर्न डिस्टर्बन्स) येऊ घातला असून, २६ डिसेंबरपासून हलक्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रभावामुळे गेल्या आठवड्याभरात पुणे शहर आणि परिसरात थंडीचा कडाका वाढला होता. किमान तापमानात सातत्याने घट होत होती. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे सहा अंश सेल्सियस, तर शिवाजीनगर येथे सात अंश सेल्सियसपर्यंत पारा घसरला होता.

त्यामुळे दिवसाही हुडहुडी भरल्याचा अनुभव येत होता. चार दिवसांपूर्वीच यंदाच्या थंडीच्या हंगामातील आतापर्यंतच्या किमान तापमानाची नोंद झाली होती. मात्र, आता पुन्हा किमान तापमानात वाढ होऊ लागली आहे. बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे शनिवारी शहर आणि परिसरात दाट धुके पडले होते.

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार रविवारी वडगाव शेरी येथे १९.२ अंश सेल्सियस, मगरपट्टा येथे १९.१, कोरेगाव पार्क येथे १८.५, दापोडी येथे १८.३, शिवाजीनगर येथे १५.५ अंश सेल्सियस, एनडीए येथे १५.३ तापमान नोंदवले गेले आहे. ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी म्हणाले, की बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे तापमानात वाढ होऊन थंडीचा जोर कमी झाला आहे. पश्चिमी विक्षोभामुळे २५ डिसेंबरपासून आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. २६ ते २८ डिसेंबर या कालावधीत अतिहलक्या ते हलक्या पाऊस पडू शकतो. तसेच ढगाळ हवामानामुळे दिवसा तापमान कमी राहून वाऱ्यांमुळे गारवा जाणवू शकतो.

## संपादकीय



### पी.व्ही. नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्राम त भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनम ोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनम ोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फ ुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले.

आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# चटका लावून जाणारी निवृत्ती !!



भारताचा अव्वल ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विन याने ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या कसोटी नंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधून निवृत्तीची घोषणा केली. रविचंद्रन आश्विन याच्या निवृत्तीच्या घोषणेने क्रिकेट रसिकांना धक्का बसला कारण त्याची निवृत्ती अनपेक्षित होती. आश्विन असा काही निर्णय घेईल असे कोणालाच वाटले नव्हते कारण त्याच्यात अद्याप बरेचसे क्रिकेट शिल्लक होते. जरी तो आज ३८ वर्षाचा असला तरी तरी तो फिट आणि फॉर्मात होता.

सहा महिन्यांपूर्वीच इंग्लंड विरुद्धच्या राजकोट कसोटीत त्याने ५०० बळींचा टप्पा गाठत विक्रमी कामगिरी केली होती. कसोटी क्रिकेटमध्ये पाचशे बळी घेणारे मोजकेच गोलंदाज आहेत त्यात आश्विनचा समावेश झाला होता. भारताच्या दृष्टीने पाहायला गेले तर कसोटीत पाचशे बळी मिळवणारा तो भारताचा दुसराच गोलंदाज आहे. या आधी अशी कामगिरी भारताचा महान लेगस्पिनर अनिल कुंबळे यालाच करता आली आहे. आश्विनने ५३७ कसोटी बळी घेतले आहेत आणि त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळे होता अनिल कुंबळे याने कसोटीत ६१९ बळी घेतले आहेत याचाच अर्थ दोघांमध्ये आता फक्त ८२ बळींचे अंतर होते. आश्विन आता ३८ वर्षाचा आहे. त्याचा फॉर्म आणि फिटनेस उत्तम आहे त्यामुळे तो आणखी एक दीड वर्ष सहज खेळू शकला असता.

तो जर आणखी एक दीड वर्ष खेळला तर तो अनिल कुंबलेला मागे टाकून भारताकडून सर्वाधिक बळी मिळवणारा गोलंदाज ठरला असता. मात्र त्याने त्याची वाट न पाहता निवृत्ती घोषित केली त्यामुळेच त्याची निवृत्ती क्रिकेट रसिकांना चटका लावून गेली. अर्थात त्याच्या या कृतीतून त्याच्या विषयीचा आदर आणखीन वाढला. आपण विक्रमासाठी नाही तर देशासाठी खेळलो हे त्याने कृतीतून सिद्ध केले. रविचंद्रन आश्विन हा जगातील सर्वाधिक धोकादायक गोलंदाज समजला जात असे. विशेषतः भारतीय खेळपट्ट्यांवर तर तो अधिक धोकेदायक ठरत असे. त्याने मिळवलेल्या ५३७ बळीपैकी ३८३ बळी त्याने भारतात घेतल्या आहेत. परदेशातही त्याची कामगिरी चांगली आहे. परदेशातही त्याने बळी मिळवलेले आहेत. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध त्याने सातत्याने चांगली गोलंदाजी केली आहे. त्याने केवळ गोलंदाज म्हणून नाही तर फलंदाज म्हणूनही चांगली कामगिरी केली आहे. कसोटीत त्याने सहा शतके झळकावली आहेत. कसोटीत सहा शतके झळकावणे ते ही सातव्या, आठव्या क्रमांकावर येऊन ही साधी गोष्ट नाही. कसोटीत ५०० बळी आणि ६ शतक झळकावणारा तो एकमेव खेळाडू आहे. अशी कामगिरी एक चांगला अष्टपैलू खेळाडूच करू शकतो. आश्विनने हे करून आपण केवळ गोलंदाज नसून अष्टपैलू खेळाडू आहोत हे सिद्ध केले आहे. आश्विनने कसोटीत ११ वेळा मालिकाविराचा पुरस्कार जिंकला आहे हा देखील एक विक्रमच आहे. मागील दशकभरात भारताने कसोटीत जे वर्चस्व गाजवले त्यामागे आश्विन हे एक महत्वाचे कारण आहे. आश्विनने केवळ कसोटीतच नाही तर एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही चमकदार कामगिरी केली. एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने खूप बळी मिळवले आहे. कसोटी प्रमाणेच एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. आश्विन हा भारताचा खराखुरा मॅच विनर खेळाडू आहे. २०११ साली जेंव्हा त्याने भारताकडून कसोटीत पदार्पण केले तेंव्हा अनिल कुंबळे निवृत्त झाला होता तर हरभजन सिंगचा उतरता काळ सुरू झाला होता. या दोघांनी जवळपास दीड दशके भारतीय फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळली होती त्यांच्या नंतर भारतीय फिरकीची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न होता कारण त्यावेळी त्यांची जागा घेणारा तर सोडाच पण त्यांच्या जवळपास जाऊ शकणारा एकही फिरकी गोलंदाज दिसत नव्हता. आश्विन ज्यावेळी आला त्यावेळीही तो इतकी मोठी मजल मारेल असे भाकीत कोणी केले नव्हते मात्र त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले आणि भारताला अनेक अप्रतिम विजय मिळवून दिले. त्यामुळेच तो आज महान गोलंदाजांच्या पंगतीत जाऊन बसला. रविचंद्रन आश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी देशांतर्गत क्रिकेट ही गाजवून सोडले होते. त्याने रणजी सामन्यात सातत्याने बळी मिळवले मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिली ती आयपीएलने. आयपीएलमध्ये आश्विनने चेन्नई सुपर किंग्जचे प्रतिनिधीत्व केले. मुथय्या मुरलीधरन हा चेन्नई सुपर किंग्जचा प्रमुख गोलंदाज होता. कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गोलंदाजीची सुरुवात फिरकीने करायची होती मात्र मुरलीधरन सुरुवातीलाच गोलंदाजी करण्यास तयार नसल्याने धोनीने चेंडू आश्विनकडे सोपविला. आश्विनने संधीचे सोने करीत प्रतिस्पर्धी संघाची सलामीची फळी कापून काढण्याची कामगिरी केली आणि तिथेच धोनीचा आश्विनवर विश्वास बसला. आयपीएलमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केल्याने धोनीने त्याला भारताकडून खेळायची संधी दिली. आश्विनने धोनीने टाकलेला विश्वास सार्थ ठरवला आणि भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले. कसोटीत तर त्याने करामत केली. खेळपट्टी कुठलीही असो आपल्या फिरकीने आश्विन त्यावर रंग भरत असे. त्याच्या बोटांमध्ये जादू होती. त्याच्याकडे शेन वॉर्न सारखे ग्लॅमर नव्हते, मुथय्या मुरलीधरन सारखी दहशत त्याच्याकडे नव्हती, कुंबळे, हरभजनसिंग सारखी लोकप्रियता देखील त्याला मिळाली नाही तरीही तो या दिग्गजांच्या पंगतीत जाऊन बसला कारण त्याची शैली वेगळी होती. त्याने कोणाचीही कॉपी केली नाही. त्याने स्वतःची वेगळी शैली विकसित केली. जगातील एक सर्वोत्तम हुशार फिरकी गोलंदाज म्हणून त्याने अल्पावधीतच ख्याती मिळवली. कारण चेंडू बोटांनी, मनगटांनी वळत असला, तरी आधी डोक्यात तो समोरच्या फलंदाजाला कसा टाकायचा याचे चित्र तो आधीच तयार करून ठेवायचा म्हणूनच त्याच्या चेंडूचा सामना करताना भल्या भल्या फलंदाजांची भंबेरी उडायची. तो आपल्या गोलंदाजीत सतत नवनवीन प्रयोग करायचा. आर्म बॉल, कॅरम बॉलचा तो खुबीने वापर करायचा. ऑफ स्पिनर असूनही तो मध्येच लेगब्रेक आणि गुगली टाकायचा त्यामुळे फलंदाजांची दांडी गुल व्हायची. त्याने आता निवृत्ती स्वीकारल्याने त्याची ती गोलंदाजी पुन्हा पाहायला मिळणार नाही अर्थात तो आयपीएल आणि क्लब क्रिकेट खेळेल पण चार षटकांच्या क्लब क्रिकेट मधील त्याच्या गोलंदाजीला कसोटी क्रिकेट मधील गोलंदाजीची सर येणार नाही. कसोटीत त्याची उणीव नेहमीच जाणवत राहील. त्याच्या तोडीचा तर सोडाच त्याच्या जवळपास पोहचू शकेल असा कोणताच गोलंदाज आज भारतात नाही त्यामुळेच त्याच्या निवृत्तीने भारतीय क्रिकेट मध्ये मोठी पोकळी निर्माण होणार आहे. निवृत्ती नंतर रविचंद्रन आश्विनने त्याची ऑफ स्पिनची कला तरुण, युवा होतकरू खेळाडूंना शिकवावी आणि त्याच्यासारखे खेळाडू त्याने देशाला निर्माण करून द्यावेत हीच त्याच्याकडून क्रिकेट रसिकांची अपेक्षा आहे रविचंद्रन आश्विनला निवृत्ती नंतरच्या आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### आयुष्य मान..

अति महत्वकांक्षेला
सरळदाखव अस्मान
आकाश नको ठेंगणे
न्हावे लागेल भस्मानं

बंडखोरी दडपू टाका
घालेल उगाचं थैमान
कटूनिर्णय धाडसाचे
जोशात काढ फर्मान

सोसेल रूचेल तेवढा
गुपचुप करा अपमान
डोईवरून नको पाणी
कशास फुकटचामान

कायम ठेवावे सत्तेत
भले चांगले विद्यमान
कार्यकुशल निष्ठावान
योग्य साधे विद्या मान

भ्रष्टाचार शिंतोडेथोडे
वाकवेल तीर कमान
शुध्द चरित्र येता नेता
उंचवावी उंच कमान

स्थिर स्थावर निश्चित
धष्ट पुष्ट हवे यजमान
येतेलं अन् जातीलही
अस्थिर असे मेहमान

निष्ठेने करा जन सेवा
सत्ताहोई आयुष्यमान
मुश्कीले लाभे सुसंधी
जन भावनेचा सन्मान

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# जिल्ह्यातील ४०४ महसूल गावांमध्ये 'पेसा दिन' साजरा होणार

**दि.२१, ठाणे :** केंद्र शासनाने दि. २४ डिसेंबर, १९९६ रोजी पंचायती संबंधीचे उपबंध(अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा पारित केला आहे. पेसा कायद्याच्या निर्मितीला दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी २८ वर्षे पूर्ण होत आहे, त्यानिमित्ताने पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशाने हा दिवस पेसा दिन म्हणून मुरबाड, भिवंडी, शहापूर तालुक्यातील महसूल गावांमध्ये साजरा करण्यात येणार आहे.

पंचायती राज मंत्रालयाचे अनुसूचित क्षेत्रांमध्ये पेसा कायद्याच्या अंमलबजावणीला बळकटी देण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहे. पेसा दिनाच्या निमित्ताने ग्रामसभा सदस्य, पंचायत सदस्य तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची क्षमताबांधणी व्हावी व त्यांच्यामध्ये जनजागृती वाढावी तसेच त्यांचा या कायद्याच्या अंमलबजावणीतील सहभाग वाढवून, ग्रामसभांचे सक्षमीकरण आणि अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या कामकाजात सुधारणा ही विशेष उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पेसा दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने गाव/ग्रामपंचायत पातळीवर मेळावा,



प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत अंतर्गत सर्व पेसा गावातील संबंधीत घटकांनी सहभाग नोंदवावा तसेच ग्राम सभा सदस्यांनी जास्तीतजास्त उपस्थिती रहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील, मुरबाड पंचायत समिती क्षेत्रातील ५५ ग्रामपंचायतींमधील १०१ महसूल गाव, भिवंडी पंचायत समिती क्षेत्रातील ४० ग्रामपंचायतींमधील ७३ महसूल गाव तर शहापूर पंचायत समिती क्षेत्रातील ११० ग्रामंपचायतींमधील २३० महसूल गाव असे एकूण ग्रामपंचायत २०५ तर महसूल गाव ४०४ येथे पेसा दिन प्रभावीपणे साजरा करण्यासाठी ग्रामपंचायत विभागाच्यावतीने नियोजन करण्यात येत आहे. पेसा कायद्याचे उत्तम ज्ञान असलेल्या व शक्यतो स्थानिक बोली भाषेचे जाणकार व्यक्ती, संस्था, अधिकारी यांनी उपस्थित सर्वांना पेसा कायद्याविषयी माहिती देणार आहेत, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) प्रमोद काळे यांनी दिली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पंचायत समिती भिवंडी,शहापूर व मुरबाड येथील गट विकास अधिकारी, अधिनस्त विस्तार अधिकारी (पं), तालुका व्यवस्थापक(पेसा), तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा), ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम सभा मोबिलायझर व ग्रामस्तरीय कर्मचारी इ. सर्व यंत्रणेला पेसा दिन अंमलबजावणी उत्कृष्टपणे नियोजित करण्याबाबत निर्देशित केले आहे.

पेसा कायद्याशी संबधित घोष वाक्य व बॅनर यांचा वापर करून पेसा कायद्याची जनजागृती करण्यात येणार असून अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामस्थांनी पेसा दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

# महाबळेश्वर येथे सापडले दुर्मिळ प्रजातीचे वटवाघूळ !

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२१, महाबळेश्वर :** महाबळेश्वर हे जैव विविधतेने नटलेले आहे. येथील विविध भागात अनेक वन्य प्राण्या बरोबरच वटवाघळांच्या बऱ्याच प्रजाती आढळतात. नुकतेच येथे वटवाघळाची एक दुर्मिळ प्रजाती आढळली असून या प्रजातीस पेंटेड बॅट या नावाने ओळखले जाते.



नारंगी रंग पंखावरती काळे त्रिकोणी पट्टे असणारे दूर्मिळ वटवाघूळ महाबळेश्वर परिसरात राहणाऱ्या सरफराज शेख यांच्या घरात आढळले हे वटवाघूळ व त्याचा रंग पाहता सरफराज यांनी हे वटवाघूळ बरणीच्या साहाय्याने पकडुन ते वटवाघूळ महाबळेश्वर येथील वनविभागाच्या कर्यालया मध्ये वनरक्षक लहू राऊत याच्या ताब्यात दिले. यावेळी सरफराज शेख, श्रीकांत पारठे, सारा शेख, नासिर जुंद्रे इ. उपस्थित होते. यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी गणेश महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक लहू राऊत वनरक्षक रमेश गडदे तसेच वनकर्मचारी यांनी या दुर्मिळ वटवाघळास नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना; तरुण-तरुणींना उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण - २०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे. योजनेचा उद्देश:- राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशिलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे. पात्रता व अटी :- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ से ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती, जमाती, महिला, अपंग, माजी सैनिक, इ.मा.व., वि.जा., अ.ज., अल्पसंख्याक) ५ वर्षांची अट शिथिल, रु.१० लाखावरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रू.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास, अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.प्रकल्प मर्यादा किंमत:- प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा, कृषी पूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु.२० लाख. योजना अंमलबजावणी यंत्रणा - शहरी भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र, ग्रामीण भागांसाठी जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

आर्थिक अनुदान :- प्रवर्ग व स्थाननिहाय १५ टक्के ते ३५ टक्के पर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे आणि स्वगुंतवणूक ५ टक्के ते १० टक्के राहील. वित्तीय संस्था/ बँक- सर्व राष्ट्रीय बँका, खाजगी बँका तसेच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत प्रकरण करता येईल.योजनेंतर्गत पात्र घटक :- सेवा उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारीत उद्योग, ई. वाहतूक व्यवसाय, फिरते विक्री केंद्र इ., अर्जाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी https://maha-cmegp.gov.in, ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. उत्पादन प्रवर्गातील उद्योगांसाठी २ आठवडे व सेवा, कृषीपुरक उद्योग व्यवसायासाठी १ आठवडा मुदतीचे प्रशिक्षण असेल.

आवश्यक कागदपत्रे:- जन्मदाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेसंबंधीचे कागदपत्रे प्रमाणपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड, नियोजित उद्योग, व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (सध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल, जातीचे प्रमाणपत्र (एससी, एसटी. प्रवर्गासाठी), विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक), वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (अंडरटेकिंग).

या योजनेच्या कार्यवाही विषयी अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे, एमआयआडीसी ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुलुंड चेक नाका समोर, ठाणे पश्चिम येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे यांनी केले आहे.

# दिनांक २५ डिसेंबर पर्यंत १८ ते ७० वर्ष वयोगटातील नागरिकांचे होईल प्रकृती परिक्षण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, छत्रपती संभाजीनगर :** 'देश का प्रकृती परिक्षण' या अभियानाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या प्रकृती परिक्षणाने या अभियानाचा प्रारंभ झाला आहे. दिनांक २५ डिसेंबर पर्यंत हे अभियान सुरु राहणार आहे. या अभियानांतर्गत देशातील १८ ते ७० वर्षापर्यंतच्या सर्व नागरिकांचे प्रकृती परीक्षण आयुर्वेद डॉक्टर्स, वैद्यकीय अधिकारी, खाजगी तसेच आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी करणार आहेत. प्रकृती परीक्षणानंतर आयुष मंत्रालयाकडून व्यक्तीच्या




प्रकृतीनुसार आहार-विहार, पथ्य-अपथ्य, दिनचर्या, ऋततुचर्या इ.बाबत नियमित मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्हा आयुष कक्षाच्या पुढाकाराने जिल्ह्यातील नागरिकांचे प्रकृती परिक्षण करण्याचे नियोजन केले आहे. या निमित्ताने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ.शेख शकील अहमद यांनी सर्व वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुर्वेद व युनानी दवाखाने, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आर.बी.एस.के.पथकातील आयुर्वेद वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. जिल्हयातील आयुर्वेद महाविद्यालयांचाही या मोहिमेत सहभाग असणार आहे. या मोहिमेत छत्रपती शाहु महाराज आयुर्वेद महाविद्यालय, कांचनवाडी यांच्या सहकार्याने जिल्हा रुग्णालय चिकलठाणा येथे १८ ते ७० वर्षाच्या नागरिकांसाठी दि.२५ डिसेंबर पर्यंत तज्ज्ञ आयुर्वेद डॉक्टरांमार्फत प्रकृती परिक्षणाची सुविधा सुरु करण्यात आली आहे. या मोहिमे अंतर्गत शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रकृती परिक्षण करण्यात येणार आहे व त्याची सुरुवात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या प्रकृती परीक्षणाने करण्यात आली.


# १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम

## उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारचा नवा उपक्रम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, पुणे :** अलीकडच्या काळात वाचनापासून दुरावत असलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके, वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यात सामूहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धा असे उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्याद्वारे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना आणि कार्यपद्धती देण्यात आली आहे. राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य कोणतेही पुस्तक वाचायचे आहे. या पुस्तकावर किमान ५०० शब्दांचे परीक्षण किंवा पाच मिनिटांचे सादरीकरण करायचे आहे. वाचनीय पुस्तकांची यादी प्रसिद्ध करून उच्च शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून द्यायची आहेत. स्पर्धेतील विजेत्या



परीक्षणांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात करावा. स्पर्धेतील विजेत्यांना २६ जानेवारी रोजी पारितोषिक प्रदान करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

उपक्रमासाठी राज्यस्तरीय समिती, विभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती, महाविद्यालयीन स्तरीय समिती नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वाचन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांनी पुस्तक प्रदर्शन आयोजित करावे. ग्रंथालयांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करावी, असेही नमूद करण्यात आले आहे.

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात राज्यातील ६ हजारांहून अधिक महाविद्यालये, ८३ विद्यापीठे, साडेबारा हजार ग्रंथालयांचा सहभाग आहे. शहरी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येईल. विद्यार्थ्यांनी १५ दिवसांत एक पुस्तक वाचून त्याचे परीक्षण लिहिणे किंवा सादरीकरण करणे अपेक्षित आहे. राज्यातील १० विभागातील सर्वोत्कृष्ट प्रत्येकी तीन विद्यार्थ्याची निवड करून त्या ३० विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. वाचन प्रेरणा दिनाअंतर्गत वाचन उपक्रम होत असला, तरी तो उपक्रम आणि वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम यात गुणात्मक फरक आहे. केवळ विद्यार्थ्यांसाठी असलेला हा उपक्रम एक प्रकारे विक्रमच ठरेल, असे उच्च शिक्षण संचालक डॉ, शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. त्या अंतर्गत वाचन उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे आता वाचन संकल्प महाराष्ट्राचा या नव्या उपक्रमाची भर पडल्याचे दिसून येत आहे.

# तुम्हाला माहिती आहे का ? कॉफी पिण्याचे दुष्परिणाम!

कॉफी हे जगभरात सर्वाधिक सेवन केल्या जाणाऱ्या पेयांपैकी एक आहे. बऱ्याच लोकांसाठी सकाळची सुरुवात कॉफीच्या घोटाने होते. कॉफीचे सेवन आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते.

काही अभ्यासातही, दूध आणि साखर नसलेली कॉफी दीर्घ आयुष्यासाठी चांगली आहे. पण काही लोकांसाठी ही कॉफी विषारी असल्याचे सिद्ध होते. यामध्ये या ५ आरोग्य परिस्थितींचा सामना करणाऱ्या लोकांचा समावेश आहे.

तुम्हालाही या समस्या असतील तर कॉफीचे सेवन विचारपूर्वक करा -

तुम्हाला ॲसिड रिफ्लक्स किंवा जीईआरडी (गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स



रोग) ची समस्या असल्यास, कॉफीचे सेवन केल्याने त्याची लक्षणे आणखी वाढू शकतात.

कॉफीमध्ये असलेले कॅफिन आणि ॲसिड पोटात ॲसिडचे उत्पादन वाढवतात, ज्यामुळे छातीत जळजळ आणि रिफ्लक्सची शक्यता वाढते.

कॉफीमध्ये आढळणारे कॅफिन चिंताग्रस्त किंवा निद्रानाश असलेल्या रुग्णांसाठी हानिकारक ठरू शकते.

कॅफिन मज्जासंस्थेला सक्रिय करते, ज्यामुळे हृदयाचे ठोके वाढू शकतात आणि अधिक तणाव जाणवू शकतो.

याशिवाय झोपण्यापूर्वी कॉफीचे सेवन केल्याने निद्रानाशाचा त्रास होऊ शकतो.

गरोदरपणात कॅफिनचे जास्त सेवन करू नये. कारण कॅफिनचा मुलाच्या विकासावर आणि आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

संशोधनात असे आढळून आले आहे की गरोदरपणात कॅफीनचे जास्त सेवन केल्यास मुदतपूर्व जन्म, कमी वजनाची बाळे आणि गर्भपात होण्याचा धोका वाढू शकतो.

**टीप :** वरील सर्व गोष्टी माहिती म्हणून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत. एबीपी माझा यातून कोणताही दावा करत नाही. कोणताही उपाय किंवा तज्ज्ञ किंवा डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्यावीत.

# थोडक्यात

## पाहमी केंद्रातील केंद्रस्तरीय क्रीडा महोत्सव आनंदाच्या वातावरणात संपन्न

**अक्षराज : रजत डेकाटे**



**दि.२२, भिवापूर (नागपूर) :** भिवापूर पंचायत समिती अंतर्गत जि.प.उ. प्राथमिक शाळा सालेभट्टी जवळी शाळेच्या मैदानावर पाहमी केंद्र अंतर्गत केंद्रस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. यात पाहमी केंद्र अंतर्गत येणाऱ्या १२ शाळेमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. भिवापूर पंचायत समितीचे सदस्य कृष्णाजी घोडेस्वार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विजय जिडगीलवार, सरपंच सुनंदा इरपाते तसेच शाळा समितीच्या अध्यक्षा सारिका लेदाडे, उपाध्यक्ष दिवाकर चव्हाण या मान्यवरांची उपस्थित कार्यक्रमाला लाभली होती. कबड्डी, खो-खो, लंगडी, लांब-उडी, उंच उडी, रिले, कुस्ती, यासह अन्य खेळाचे सामने तसेच एकलनृत्य, सामूहिक नृत्य, गीतगायन,नक्कल, बुद्धिबळ, आदी स्पर्धांचा समावेश होता. या क्रीडा स्पर्धेमध्ये पाहमी केंद्रातील कबड्डी मुले पाहमी, कबड्डी, लंगळी मुली मालेवाडा (गोटाळी), सामूहिक नृत्य मालेवाडा शाळेतील स्पर्धक विजयी ठरले.

क्रीडा स्पर्धा संपल्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बॉक्सेस वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख प्रशांत टेंभुर्णे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रवीण गिरडे यांनी तर ज्ञानेश्वर जगताप यांनी आभार मानले. गजू गोंगल, किशोर ढगे, पियुष सवाई, पोलीस पाटील विकास वांढरे, ग्रामपंचायत सदस्य विष्णुदास धेटे, विकास भावे, विजय मेश्राम, आचल मेश्राम, शीला रोडे, वर्षा चापले, वर्षा कश्यप तसेच पाहमी केंद्रातील शिक्षक व मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी विकास राठोड, राजु बारेकर, रामचंद्र लव्हे, पद्माकर ठाकरे, सुरज येल्ले, अशोक मेश्राम, संपूर्ण पाहमी केंद्रातील शिक्षक तसेच सुनिता ठाकरे, अंगणवाडी वंदना सांबरे, रंजना धेटे, सुनिता कन्नाके या संपूर्ण गावकरी मंडळींनी सहकार्य केले.

## परभणी येथे संविधानाच्या पुस्तकाची विटंबनेच्या निषेधार्थ दिले निवेदन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**




**दि.२२, विंचूर (नाशिक) :** परभणी येथे झालेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे संविधानाच्या पुस्तकाची एका विकृत समाजकंटकाकडून झालेल्या विटंबनेचा निषेध म्हणून शांततेच्या मार्गाने सदर घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी विंचूर येथील सिद्धार्थ मित्र मंडळ व माता रमाबाई महिला मंडळ तसेच विंचुर ग्रामस्थांच्या वतीने निषेध नोंदवण्यात आला. व सदर आरोपीला कठोर शिक्षा व्हावी. हीच प्रशासनाला, लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांना विंचूर पोलीस चौकीत निवेदन देऊन विनंती करण्यात आली. यावेळी निवेदन देताना सीमा निकाळे, कविता रणखांबे, मनिषा हरळे, सुनिता साळवे, ज्योती निकाळे, रत्ना निकाळे, मनिषा रुपवते, उदय रणखोबे, राजाभाऊ दरेकर, सरपंच सचिन दादा दरेकर, गंगाधर रणखांबे, कैलास निकाळे, कैलास बुरसळ, शिवा विंचुरकर, बाविस्कर व आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री अमित शहांच्या विरोधात उबाठा चे आक्रोश आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.२२, दिवा (ठाणे) :** केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर केलेल्या बेताल वक्तव्य निषेधार्थ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दिवा शहरप्रमुख सचिन पाटील ह्याच्या नेतृत्वखाली निषेध आदोलन रविवार, दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी ११:३० वाजता करण्यात आले. महाविकास आघाडी कार्यकर्त्यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या आक्रोश व्यक्त केले. यावेळी युवासेना शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, उपशहर प्रमुख तेजस पोरजी, विधानसभा संघटीका योगिता नाईक, शहर संघटीका ज्योती पाटील, शहर समन्वविका प्रियांका सावंत, उपशहर संघटीका स्मिता जाधव, काँग्रेस चे सुरेश भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट चे दिपक मोहिते, किरण ताटे, ज्योती पाटील, विभाग प्रमुख चेतन पाटील, हेमंत नाईक, संजय जाधव, शनिदास पाटील इतर पदाधिकारी कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## झुंजला मराठा सह्याद्रीचा उद्या मुंबई रंगमंचावर...

**अक्षराज : उदय दणदणे**




**दि.२२, मुंबई :** कोकणातील नमन लोककला मुंबईतील विविध नाट्यगृह हाऊसफुल्ल गर्दीत सादरीकरण होत असून यात अनेक आयोजक,निर्माते यांचे मोठे योगदान आहे, सलग २५ वर्षे नमन लोककलेच्या माध्यमातून ऐतिहासिक वग नाट्यकृतीतून महाराष्ट्राचा ज्वलंत इतिहास मांडणारा गुहागर तालुक्यातील लेखक/दिग्दर्शक संदिप कानसे यांची नवीन वगनाट्यकृती झुंजला मराठा सह्याद्रीचा मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी रात्रौ ०८:३० वा. मा.दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह विलेपार्ले मुंबई येथे सादरीकरण होणार आहे.सोबत,खेळे, गण, गवळण सदर नमन प्रयोगाचे खास आकर्षण असणार आहे. कोकणी निखिल आणि कलारंग प्रोडक्शन वतीने ह्या नमन प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे.